स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade
NAAC Re-accredited
(4th Cycle)
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

जा.क्र.:कबचौउमवि/१६/ईमेल/२०२४ दिनांक :- १५ नोव्हे., २०२४

**जळगाव दि.१५ (         )** पश्चिम विभागीय राष्ट्रीय सेवा योजना पूर्व प्रजासत्ताक दिन पथसंचलन निवड शिबिराच्या निमित्ताने सात राज्यातील २०० विद्यार्थ्यांचा सहभाग, दररोज सायंकाळी आपआपल्या राज्यातील सांस्कृतिक कार्यक्रमांचे मनमोहक दर्शन, दिवसभर पथ संचलनाचा सराव आणि वेगवेगळया भाषांमधील संवाद यामुळे विद्यापीठ परीसरात खऱ्या अर्थाने राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन दिसून येत आहे.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात भारत सरकारचे युवक कल्याण व क्रीडा मंत्रालय आणि रासेयोचे विभागीय संचालनालय पुणे व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबीर सुरु झाले आहे. महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, तेलंगना, गुजरात, दमण, दादरा-नगरहवेली, गोवा या सात राज्यातील २०० रासेयो स्वंयसेवक यात सहभागी झाले असून दि.१२ नोव्हेंबर पासून सुरु झालेले हे शिबीर दि. २१ नोव्हेंबर पर्यंत होणार आहे. दररोज सकाळी विद्यापीठ क्रीडा संकुलाजवळ ध्वज संचलन त्यानंतर दोन सत्रात होणारे पथ संचलन सराव, दुपारी ओळख व गटचर्चा आणि सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रम असे दिवसभराचे शिबीरार्थींचे वेळापत्रक आहे.

शुक्रवार दि.१४ नोव्हेंबर रोजी कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांनी पथ संचलनाच्या सरावाला भेट दिली. यावेळी त्यांच्यासोबत प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील, युथ ऑफीसर सुमंतकुमार यादव, रासेयो संचालक डॉ.सचिन नांद्रे उपस्थित होते. दि.१३ रोजी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा.योगेश पाटील, दि.१४ रोजी व्य.प.सदस्य प्रा. म.सु.पगारे आणि दि.१५ रोजी प्रा.पवित्रा पाटील यांच्याहस्ते ध्वजारोहण झाले. गेल्या तीन दिवसात सायंकाळी आपल्या राज्यातील संगीत, नृत्य यावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम विद्यार्थ्यांनी सादर केले. यामध्ये कुचीपुडी, कत्थक, गरबा, तेलंगणाचे बंजारा नृत्य, कोळी नृत्य, आदिवासी नृत्य आणि महागंगेवर आधारित एकपात्री प्रयोग आदी कार्यक्रमांचा समावेश होता. या सांस्कृतिक कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

पथ संचलन सराव एन.सी.सी.चे बटालियन मेजन अनिल साळुंखे, सुमंतकुमार यादव यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे. रासेयो प्रादेशिक संचालक अजय शिंदे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ.अजय शिंदे यांनी प्रतिक्रिया व्यक्त करतांना शिबीराच्या आयोजनाबद्दल समाधान व्यक्त केले. या शिबीरातून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय पातळीवर पथ संचलनाची संधी मिळणार असल्याचे ते म्हणाले. या शिबीराच्या यशस्वीतेसाठी डॉ.दिनेश पाटील, प्रा.मनीष करंजे, प्रा.संजय शिंगाणे, डॉ.हेमंत पाटील, प्रा. हेमंत जोशी, प्रा.मनोहर पाटील, प्रा.योगेश पुरी, प्रा.पांडुरंग पाटील, रासेयो सल्लागार समिती सदस्य, जिल्हा समन्वयक व विभागीय समन्वयक हे प्रयत्नशील आहेत.

## बातमी क्र.२

जळगाव दि. १५ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ संचलित आदिवासी अकादमी आणि माय भारत (नेहरू युवा केंद्र) यांच्या संयुक्त विद्यमाने जननायक बिरसा मुंडा जयंती निमित्त नंदुरबार येथील आदिवासी अकादमीत जनजातीय गौरव दिन साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमास प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील, अकादमीचे संचालक प्रा.के.एफ. पवार, जिल्हा युवा अधिकारी भूषण पाटील, सिलेज प्रकल्पाचे प्रमुख प्रा.के.एस. विश्वकर्मा, समन्वयक प्रा.जसपाल बंगे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी भूषण पाटील यांनी बिरसा मुंडा यांनी दिलेल्या आदिवासी हक्कांच्या लढयाची विद्यार्थ्यांना माहिती दिली. प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे यांनी आदिवासी अकादमीच्या माध्यमातून विविध शैक्षणिक उपक्रम विद्यापीठा मार्फत भविष्यातही राबविले जाणार असल्याचे सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांशी मुक्त संवाद साधून आदिवासी अकादमी बद्दलचे अनुभव ऐकूण घेतले. समाजकार्य विभागाचे विद्यार्थी चिन्मय अग्निहोत्री, साईराज माळी, प्रवीण माळी यांनी बिरसा मुंडा यांच्या कार्याविषयी मनोगत व्यक्त केले. प्रा. के.एफ. पवार यांनी विद्यार्थ्यांना परीक्षांबाबत मार्गदर्शन केले. एस्तेर वळवी यांनी सूत्रसंचालन केले तर कुणाल वीर यांनी आभार मानले. प्रा. स्मिता देशमुख, प्रा. अर्चना पाटील, प्रा. हर्षल चौरे यांनी कार्यक्रमासाठी परीश्रम घेतले.

## बातमी क्र.३

**जळगाव दि.१५ (                    )** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास व संशोधन केंद्रातर्फे साहित्य सृजन या भित्तीपत्रकाचे विमोचन व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेच्या संचालक प्रा.मधुलिका सोनवणे यांच्या हस्ते झाले.

प्रशाळेचे संचालक प्रा.म.सु.पगारे अध्यक्षस्थानी होते. विविध साहित्यिकांच्या नावाजलेल्या पुस्तकांचे मुखपृष्ठ व मलपृष्ठ यांचे कोलाज असलेले हे भित्तीपत्रक आहे. यावेळी डॉ.कृष्णा संदानशिव यांनी प्रा.म.सु. पगारे यांच्या ' प्रज्ञा स्पंदनेचे सौदर्यशास्त्र ' या आगामी पुस्तकाच्या मलपृष्ठावरील मजकुराचे वाचन केले. डॉ.प्रिती सोनी, डॉ.सुदर्शन भंवरे, प्रतिभा गलवाडे, स्नेहा गायकवाड, भारती सोनवणे, नेत्रा उपाध्ये यांनी देखील विविध पुस्तकांच्या मलपृष्ठावरील मजकुराचे वाचन केले. प्रा.मधुलिका सोनवणे यांनी पुस्तक वाचनाचे महत्व सांगितले. प्रा. पगारे यांनी अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नेत्रा उपाध्ये यांनी केले. स्नेहा गायकवाड यांनी आभार मानले.

.................................................................................................................

**जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बा**तमी/२०२४ दिनांक: १५ नोव्हेंबर, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी